अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | शुक्रवार
१३.११.२०२६

वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 9763157712

वर्ष: ०७ | अंक: २८३ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

थोडक्यात

मायक्रोसॉफ्टची जागतिक यंत्रणा कोलमडली

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई - मायक्रोसॉफ्ट ३६५ च्या यंत्रणेत अचानक मोठा तांत्रिक बिघाड झाल्यामुळे जगभरातील लाखो युजर्सना नाहक मनस्ताप सहन करावा लागला. या तांत्रिक समस्येमुळे ऑफिसच्या कामकाजासाठी अत्यंत महत्त्वाचे असणारे आउटलुक, मायक्रोसॉफ्ट टीम्स, शेअरपॉईंट ऑनलाईन आणि एआय असिस्टंट कोपायलट या सेवा पूर्णपणे बंद पडल्या होत्या. या जागतिक बिघाडाचा मोठा फटका भारतालाही बसला आहे. इंटरनेट सेवा आणि अॅप्समधील अडीअडचणींवर लक्ष ठेवणारी कंपनी 'डाऊनडिटेक्टर' च्या मते, आज सकाळी ९ वाजेपर्यंत भारतातील ८०० हून अधिक युजर्सनी मायक्रोसॉफ्टच्या सेवा बंद असल्याच्या अधिकृत तक्रारी नोंदवल्या आहेत.

मायक्रो फायनान्सच्या जाचाला कंटाळून शेतकऱ्यानं स्वतःला विहिरीत झोकून दिलं

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून गंभीर दखल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



अमरावती - अमरावतीच्या नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील सावंगा गुरव येथे मायक्रो फायनान्स कंपनीच्या जाचाला कंटाळून ४५ वर्षीय शेतकऱ्याने विहिरीत उडी घेऊन आपली जीवनयात्रा संपवली असल्याची माहिती समोर आली आहे.

संदीप अवधूत कर्डे असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव असून त्यांच्याकडे एक हेक्टर शेती होती आणि त्यांच्यावर मायक्रो फायनान्सचे दीड लाखांचे कर्ज असल्याची माहिती पुढे येत आहे.

या दुर्दैवी घटनेची पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गंभीर दखल घेतली असून, कर्जवसुलीसाठी शेतकऱ्यांनी फक्त एकदा प्रशासनाला किंवा जनप्रतिनिधींना कळवावे, आम्ही जबाबदारी घेऊ.

कारण आम्ही सगळ्या फायनान्स कंपन्यांना इशारा दिला आहे की, कोणत्याही शेतकऱ्याला धमकी देऊ नये, अशी माहिती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

दुसरीकडे, कर्जमाफीचा लाभ गावात राहून वर्षानुवर्षे शेती करणाऱ्या खऱ्या शेतकऱ्यांना नाही? तर गुंतवणुकीसाठी शहराच्या जवळपास शेती घेणारे हौशी शहरी शेतकरी मात्र कर्जमाफीच्या यादीत? अशा आशयाची तक्रार नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

सरकारची कर्जमाफी गावातील खऱ्या शेतकऱ्यांसाठी? की गुंतवणुकीसाठी शेती घेणाऱ्या शहरी शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने मोठा गाजावाजा करत शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी जाहीर केली. आतापर्यंत कर्जमाफीच्या अनेक याद्या जाहीर झाल्या. तरी नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यात कर्जमाफीच्या एका नंतर एक येणाऱ्या यादीनंतर ही अनेक शेतकऱ्यांची कर्जमाफी झालेली नाही.. उलट गावात न राहणाऱ्या, शेती न कसणाऱ्या, फक्त गुंतवणुकीसाठी शेती घेऊन ती भाड्यावर देणाऱ्यां हौशी शेतकऱ्यांचे नाव कर्जमाफीच्या यादीत दिसत असल्याने खऱ्या शेतकऱ्यांमध्ये नैराश्याची भावना निर्माण झाली आहे. सरकारची कर्जमाफी गावातील खऱ्या शेतकऱ्यांसाठी आहे? की गुंतवणुकीसाठी शेती घेणाऱ्या शहरी शेतकऱ्यांसाठी आहे? असा सवाल कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांनी विचारला आहे... विशेष बाब म्हणजे हिंगणा तालुक्यातील एखाद्या गावातील शेतकऱ्यांची ही व्यथा नाही, तर शेष नगर, येरणगाव, कवडस, अंबाझरी, दाभा, अंबाडा अशा अनेक गावातील शेतकऱ्यांनी सारखीच तक्रार केल्यामुळे प्रशासनाने या भागात कर्जमाफीचे संदर्भात लक्ष घालण्याची गरज आहे.

लवकरच या गावांमध्ये स्वतः चौकशी करणार असल्याचे आश्वासनही तहसीलदाराने दिले. दरम्यान सध्या प्रशासनाचा कुठलाही अधिकारी यासंदर्भात कॅमेरासमोर बोलायला तयार नाही.

मुंबईकरांसाठी सुवर्णसंधी! शिवरायांची ऐतिहासिक वाघनखे आजपासून मुंबईत

'शिवशस्त्रशौर्यगाथा' प्रदर्शनाचा चौथा टप्पा सुरू

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई - छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे प्रतीक असलेली ऐतिहासिक वाघनखे आणि मराठा साम्राज्याच्या शौर्यपरंपरेची साक्ष देणारा दुमिळ शस्त्रखजिना पाहण्याची मोठी संधी आता मुंबईकरांना मिळणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाच्या वतीने आयोजित 'शिवशस्त्र शौर्यगाथा' या आंतरराष्ट्रीय शस्त्रप्रदर्शनाचा चौथा आणि अंतिम टप्पा आज मुंबईत सुरू होत आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.आशिष शेलार यांच्या हस्ते सायंकाळी ४.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयात या प्रदर्शनाचे दिमाखदार उद्घाटन होणार आहे.

लंडनमधून आणलेल्या वाघनखांचा प्रवास आणि प्रकल्पाचा उद्देश

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्याच्या ३५० व्या वर्षानिमित्त राज्यभर विविध ऐतिहासिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबवण्यात आले. सातारा, नागपूर आणि कोल्हापूरनंतर आता मुंबईत अंतिम पर्व या शस्त्रप्रदर्शनाला राज्यभरातून अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला आहे. यापूर्वी सातारा (४ जुलै २०२४ ते ३ फेब्रुवारी २०२५), नागपूर (७ फेब्रुवारी ते २ ऑक्टोबर २०२५) आणि कोल्हापूर (३ ऑक्टोबर २०२५ ते ३१ ऑक्टोबर २०२६) येथे या प्रदर्शनाचे पहिले तीन टप्पे यशस्वीरीत्या पार पडले. या तिन्ही शहरांतील इतिहासप्रेमी, विद्यार्थी आणि संशोधकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादानंतर आता या प्रदर्शनाचा चौथा आणि अंतिम टप्पा राजधानी मुंबईत भरवला जात आहे. प्रदर्शनाच्या निमित्ताने प्रकाशित करण्यात आलेल्या द्विभाषिक शस्त्रसूचींमुळे अभ्यासकांना मोठा संदर्भ उपलब्ध झाला आहे.

एसटीच्या १३,९८० पदांच्या कंत्राटी भरतीत फसवणूक झाल्यास कठोर कारवाई

खासगी संस्थांची चौकशी होणार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई - महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात (एसटी) लवकरच सुमारे १३,९८० चालक आणि यांत्रिकी कर्मचाऱ्यांची कंत्राटी पद्धतीने भरती केली जाणार आहे. या भरती प्रक्रियेत पारदर्शकता राखण्याचे आणि उमेदवारांची फसवणूक टाळण्याचे स्पष्ट निर्देश परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. नोकरीचे आमिष दाखवून बेरोजगार तरुणांकडून पैसे उकळणाऱ्या खासगी संस्था आणि संबंधित व्यक्तींविरोधात कठोर कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

भरती प्रक्रिया नियमांनुसार राबवण्याचे निर्देश

एसटी महामंडळातील चालक आणि यांत्रिकी कर्मचाऱ्यांची भरती बाह्य संस्थेमार्फत केली जाणार आहे. मात्र, उमेदवारांची निवड महामंडळाने निश्चित केलेल्या पात्रता निकषांनुसारच व्हावी, याची दक्षता संबंधित संस्था आणि एसटी प्रशासनाने घ्यावी, असे सरनाईक यांनी स्पष्ट केले. भरती प्रक्रियेत कोणत्याही उमेदवाराची फसवणूक झाल्यास त्याची जबाबदारी एसटी प्रशासनाची असेल, असेही त्यांनी सांगितले. नोकरीचे आमिष दाखवून पैसे उकळणाऱ्या संस्थांवर कारवाई एसटी महामंडळाच्या नावाचा गैरवापर करून काही खासगी संस्था बेरोजगार तरुणांना नोकरीचे आमिष दाखवत असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे आल्या आहेत.

पत्नीचा शारीरिक व मानसिक छळ केल्या प्रकरणी

पतीविरुध्द विविध कलमान्वये गुन्हा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



वरुड - विवाहितेला शारीरिक व मानसिक त्रास देणाऱ्या पतीविरुध्द वरुड पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार, फिर्यादी महिला अल्पवयीन असताना तिची आरोपीसोबत ओळख झाली होती. त्यानंतर दोघांमध्ये प्रेमसंबंध निर्माण झाले. आरोपी विशाल विजय कळसकर (२६) ने फिर्यादीला पांढुर्णा येथे नेऊन घरगुती रितीरिवाजाप्रमाणे लग्न केल्याचे तक्रारीत नमुद आहे. या संबंधातून त्यांना चार वर्षांची मुलगी आहे. दरम्यान, आरोपी विशाल कळसकर व त्याच्या आईकडून फिर्यादीला जातीवरुन अपमानास्पद बोलून शारीरिक व मानसिक त्रास दिला जात असल्याचा आरोप आहे. या त्रासाला कंटाळून फिर्यादी मागील तीन वर्षांपासून आपल्या आईकडे राहत आहे. तरीदेखील आरोपी विशाल कळसकर फिर्यादीच्या आईच्या घरी जाऊन शिवीगाळ करीत असल्याचे तसेच फिर्यादीला ओढून मारहाण केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. यावेळी फिर्यादीच्या बहिणीलाही मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी विशाल विजयराव कळसकर (२६) रा.मुलताई चौक, वरुड याचे विरुध्द कलम ६४ (२), (उ), ६५ (१), ६५ (२), ११५ (२), ३५१ (२) ३५१ (३) भा.न्या.सं.२०२३ सहकलम ४, ६ बाल लैंगीक अपराध संरक्षण अधिनियम अन्वये गुन्ह्याची नोंद केली असून पुढील तपास सुरु आहे.

नागपूरमधील अनंततारा हॉटेलला आग, शॉर्ट सर्किटनं आग लागली, एका व्यक्तीचा मृत्यू, तीन जण जखमी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



नागपूर - राज्यातील विविध शहरांमध्ये आग लागण्याच्या घटनांचं सत्र सुरुच आहे. राज्याची उपराजधानी नागपूरमध्ये एका हॉटेलला आग लागून एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे.नागपूर अमरावती राष्ट्रीय महामार्गावरील बाजारगाव येथील अनंततारा हॉटेलला भीषण आग लागली आहे. या आगीत एकाचा होरपळून मृत्यू झाला आहे तर तीन जखमी आहेत.अनंततारा हॉटेलला शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याची माहिती समोर आली आहे. या आगीमुळं एका व्यक्तीला जीव गमवावा लागला. मृत व्यक्तीचं नाव मनोज बांडे असं असल्याचं समोर आलं आहे. मनोज बांडे हे अंजनागव सुर्जीचे असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली आहे.अनंततारा हॉटेलला रात्री ८ वाजता आग लागली आहे. या हॉटेलमध्ये पहिल्या मजल्यावर थांबललेल्या मनोज बांडे या व्यक्तीचा आगीच्या धुरात गुदमरुन त्याचा मृत्यू झाला आहे. मनोज बांडे हे अंजनगाव सुर्जी तालुक्यात मंडळअधिकारी पदावर कार्यरत असल्याची माहिती हॉटेलमधून मिळालेल्या ओळखपत्रावरुन स्पष्ट झालं आहे. हॉटेलमधील कर्मचाऱ्यांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला, मात्र हॉटेलमध्ये असलेली उपकरणं पुरेशी नव्हती. अग्निशमन दलाच्या चार गाड्या हॉटेल परिसरात दाखल झाल्या आणि त्यांच्याकडून लगेचच आग विझवण्यात आली. मात्र, या घटनेत एका व्यक्तीला जीव गमवावा लागला तर तीन जण जखमी आहेत.



Nvidia मध्ये मोठी उलथापालथ : गंभीर वादानंतर जेनसन हुआंग यांनी सोडले सीईओ पद

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



वॉशिंग्टन – एनविडियाचे सहसंस्थापक जेनसन हुआंग यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. कंपनीचे अध्यक्ष, सीईओ आणि संचालक मंडळ सदस्य या पदांवश्रफन पायउतार झाले आहेत.

जेनसन हुआंग यांनी गेल्या ३३ वर्षांपासून कंपनीचे नेतृत्व केले होते. पण कथित चिनी गुप्तहेराच्या वादात अडकल्यानंतर हुआंग यांनी हा निर्णय घेतला. त्यांच्या निकटवर्ती असलेल्या महिलेवर चीनसाठी हेरगिरी केल्याचा अमेरिकी अधिकाऱ्यांना संशय होता. कंपनीने १२ नोव्हेंबर रोजी ही अधिकृत घोषणा केली. त्यांच्या राजीनाम्यानंतर कंपनीच्या मुख्य वित्तीय अधिकारी कोलेटी क्रेस यांची अंतरिम सीईओ म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. जेनसन हुआंग यांनी १९९३ मध्ये एनविडियाची सहस्थापना केली होती. तेव्हापासून त्यांनी या कंपनीचं नेतृत्व केलं होतं. पण आता त्यांना हे पद सोडावं लागलं आहे. दुसरीकडे, कंपनीने कायमस्वरूपी सीईओ शोधाला सुरुवात केली आहे.

एनविडियाच्या संचालक मंडळाने मानले योगदानाबद्दल आभार मीडिया रिपोर्टनुसार, हुआंग यांचे त्यांच्याच कंपनीतील एका महिला अधिकाऱ्यासोबत प्रेमसंबंध होते. पण सदर महिला चिनी गुप्तहेर असल्याची माहिती अमेरिकन अधिकाऱ्यांनी दिली. या खुलाशानंतर टेक विश्वात खळबळ उडाली होती.

तसेच जेनसन हुआंग यांच्यावर पद सोडण्याचा दबाव वाढला होता. अखेर त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. जेन्सन हुआंग हे एनविडियाचे सह-संस्थापक असून कंपनीमध्ये त्यांचा ३.६१% हिस्सा असून चौथे सर्वात मोठे गुंतवणूकदार आहेत.

दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना मोठा दिलासा! २.९६ लाख विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ : १.८८ कोटी रुपये परत

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – राज्यातील दुष्काळाचा फटका शेतकऱ्यांसोबतच विद्यार्थ्यांनाही बसला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी परीक्षा शुल्क माफीचा निर्णय घेतला आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संबंधित पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या हिवाळी सत्र परीक्षेसाठी २ लाख ९६ हजार ११४ विद्यार्थ्यांना या सवलतीचा लाभ मिळणार आहे. २५ हजार विद्यार्थ्यांना भरलेले शुल्क परत विद्यापीठाशी संलग्नित ५१ महाविद्यालयांतील २५ हजार ७४ विद्यार्थ्यांनी यापूर्वीच परीक्षा शुल्क भरले होते. या विद्यार्थ्यांचे एकूण १ कोटी ८८ लाख ३३ हजार रुपये परत करण्यात येत आहेत. दिवाळीच्या काळात विद्यार्थ्यांना ही रक्कम परत देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली.

लालपरीचा दैनंदिन तोटा गेला सात कोटींवर

ऑक्टोबरमध्ये २४० कोटींहून अधिक नुकसान

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – आर्थिक संकटात असलेल्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची (एसटी) आर्थिक स्थिती ऑक्टोबर महिन्यात गंभीर झाली आहे. सप्टेंबरच्या तुलनेत ऑक्टोबरमध्ये एसटीच्या तोट्यात १५० कोटी रुपयांची वाढ झाली असून, एकूण तोटा २४० कोटी रुपयांहून अधिक झाला आहे. त्यामुळे एसटीचा दैनंदिन तोटा सात कोटी रुपयांवर पोहोचला आहे.


व्यवस्थापनाचे चुकीचे धोरणात्मक निर्णय आणि नियोजनशून्य कारभारामुळे एसटीच्या संकटात भर पडत असून, जबाबदार अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केली आहे. एसटी नफा-तोट्याच्या गणितावर चालत नसली, तरी सरकार अपेक्षित मदत करायला तयार नाही. सरकारने निधी न दिल्याने सात हजार कोटी रुपयांची देणी थकली आहेत. त्यामुळे महामंडळ स्तरावरही उत्पन्नवाढीसाठी प्रभावी उपाययोजना करण्याची गरज आहे. पण ते होताना दिसत नाही.

तोटा वाढण्यासाठी १ ऑक्टोबरपासून महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी एनसीएमसी स्मार्ट कार्डची करण्यात आलेली सक्ती हा प्रमुख मुद्दा असला, तरी महामंडळ स्तरावरही नियोजन करण्यात व्यवस्थापनाला अपयश येत आले असल्याचे दिसून येत आहे. स्मार्ट कार्डची उपलब्धता आणि नोंदणी प्रक्रिया पूर्ण झालेली नसतानाही सक्ती लागू करण्यात आली.

मंत्री संजय शिरसाट यांच्या घरावर हल्ल्याचा प्रयत्न

मद्यधुंद तरुणांनी घरासमोर येऊन दारूच्या बाटल्या फोडल्या अन...

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – राज्याचे सामाजिक न्याय मंत्री आणि छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय सिरसाट यांच्या घरावरती हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक बातमी समोर आली आहे. या हल्ल्यामध्ये दोन सुरक्षारक्षक जखमी झाल्याचे सांगण्यात येतंय. तर तीन तरुणांनी घरासमोर येऊन दारूच्या बाटल्या फोडल्या असल्याची माहिती आहे. दरम्यान या हल्ल्यानंतर मंत्री संजय शिरसाठ यांनी पोलिसांवर संताप व्यक्त केला आहे. पोलीस आयुक्तांना फोन केला असता त्यांचा फोन बंद होता, असं संजय सिरसाट म्हणालेय. दरम्यान, याप्रकरणी छत्रपती संभाजीनगरच्या सातारा पोलिसांकडून तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. मंत्री संजय शिरसाट यांच्या घरावर हल्ला करणाऱ्या तिघांची पोलिसांकडून कसून चौकशी सुरू असून आरोपी विरोधातरात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रियासुरू होती. एका पालकमंत्र्याच्या घरावर हल्ला होतो, किमान त्याची दखल तर घ्या संध्याकाळी साधारणतः साडे दहा ते अकराच्या दरम्यन ३ युवक माझ्या बंगल्यासमोर आले. पिलेल्या अवस्थेत ते होते, असं एकंदरीत ते दिसतंय. बाटल्या फोडल्या, आणि अनेक गोष्टी माझ्या खिशात असल्याचे सांगत घराकडे येऊन हल्ला करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, या संदर्भात पोलीस आयुक्तांना फोन केला असता त्यांचा फोन बंद होता, असं संजय सिरसाट म्हणालेय. एका पालकमंत्र्याच्या घरावर हल्ला होतो, किमान त्याची दखल तर घ्या, असं म्हणत संभाजीनगरचे पालकमंत्री संजय सिरसाट यांनी पोलीस प्रशासनावर नाराजी व्यक्त केली आहे.

आंदोलकावरील गुन्हा रद्द : हायकोर्टाचा निर्णय, फौजदारी कारवाईचा वापर दुर्दैवी!

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – शांततापूर्ण आंदोलन दडपण्यासाठी फौजदारी खटल्यांचा वापर केला जात असेल, तर ते लोकशाहीसाठी दुर्दैवी ठरेल, अशी खंत मुंबई उच्च न्यायालयाने व्यक्त केली. तसेच रस्त्यांच्या दुरवस्थेकडे लक्ष वेधण्यासाठीच्या आंदोलनात सहभागी झालेल्या एका व्यक्तीविरुद्धचा एफआयआर आणि आरोपपत्रही न्यायालयाने रद्द केले. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे न्या. एम. डब्ल्यू. चांदवानी यांनी २९ ऑक्टोबर रोजी दिलेल्या आदेशाची प्रत गुरुवारी उपलब्ध झाली. त्यानुसार, संविधानाने दिलेला आंदोलनाचा अधिकार आणि आंदोलनाविरोधात करण्यात येणारी कारवाई यातील सीमारेषा धूसर होऊ देता कामा नये, असे निरीक्षण खंडपीठाने नोंदवले. लोकशाही प्रक्रियेचा भाग असलेली आंदोलने दडपण्यासाठी फौजदारी खटले दाखल करता कामा नयेत. तथापि, आंदोलकांनीही कायदा हातात घेणे, हिंसाचार करणे किंवा सार्वजनिक अथवा खासगी मालमत्तेचे नुकसान करणे टाळले पाहिजे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

दिव्यांग समन्वयक समितीच्या राज्य प्रसिद्धी प्रमुखपदी राजेंद्र देशमुख यांची निवड

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मोर्शी –महाराष्ट्र राज्य दिव्यांग समन्वय समितीच्या राज्य प्रसिद्धी प्रमुखपदी अमरावती जिल्ह्यातील राष्ट्रीय दिव्यांग विकास महासंघाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र देशमुख यांची निवड करण्यात आली आहे. ठाणे येथे आयोजित दिव्यांगांच्या महासभेत ही निवड सर्वानुमते जाहीर करण्यात आली. शासनाकडून दिव्यांगांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत असल्या, तरी प्रशासनाकडून त्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याची बाब समोर येत आहे. या योजनांची योग्य अंमलबजावणी व्हावी, यासाठी ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपरिषद आणि महानगरपालिका अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निर्णय प्रक्रियेत दिव्यांगांना सहभागी करून घेणे आवश्यक आहे.

याच उद्देशाने दिव्यांगांसाठी कार्य करणाऱ्या विविध संघटना व संस्थांना एका व्यासपीठावर आणून राजकीय प्रतिनिधित्व अभियान सुरू करण्यात आले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नामनिर्देशित अथवा स्वीकृत सदस्य म्हणून दिव्यांगांना प्रतिनिधित्व मिळावे, अशी मागणी महाराष्ट्र शासनाकडे करण्यात आली आहे.

या अभियानाची राज्यस्तरापासून ग्रामस्तरापर्यंत जनजागृती करण्यासाठी ठाणे येथे झालेल्या महासभेत महाराष्ट्र राज्य दिव्यांग समन्वय समितीची स्थापना करण्यात आली. या समितीच्या राज्य प्रसिद्धी प्रमुखपदी राजेंद्र देशमुख यांची निवड समितीचे अध्यक्ष प्रशांत जाधव, कार्यकारी समन्वयक चंपतराव डाखोरे आणि सचिव सुहास काळे यांनी सर्वानुमते केली. राजेंद्र देशमुख हे गेल्या वीस वर्षांपासून सामाजिक तसेच दिव्यांग क्षेत्रात कार्यरत असून, विविध संघटना व संस्थांमध्ये पदाधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुख्यमंत्र्यांच्या हस्ते त्यांना राज्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या या निवडीबद्दल विविध संघटना, संस्थांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि मित्रपरिवाराकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

खडका-जामगाव येथे भक्तिमय वातावरणात आशीर्वचन सोहळा व कार्यकर्ता सत्कार समारंभ उत्साहात संपन्न

संत-महंतांच्या आशीर्वचनाने कार्यकर्त्यांचा सन्मान | भाजप व दादाजी भक्त परिवाराचा संयक्तउपक्रम

(प्रतिनिधी वरुड दर्पण)





वरुड – दिवाळीच्या मंगलमय पर्वाचे औचित्य साधून श्री १००८ श्री केशवानंद दादाजी धुनिवाले दरबार, खडका (जामगाव) येथे १२ नोव्हेंबर २०२६ रोजी भव्य आशीर्वचन सोहळा व कार्यकर्ता सत्कार समारंभ भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडला.

भारतीय जनता पार्टी मोर्शी-वरूड विधानसभा क्षेत्र आणि श्री दादाजी धुनिवाले भक्त परिवार, वरूड-मोर्शी तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी परमपूज्य संत-महंत व महाराज मंडळींच्या उपस्थितीत आशीर्वचन सोहळा पार पडला. तसेच पक्षाच्या संघटनात्मक कार्यात योगदान देणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यात आला.

सोहळ्याला भाजपचे जिल्हाध्यक्ष तथा आमदार प्रतापदादा अडसड, आमदार उमेशजी उर्फ चंदुभाऊ यावलकर, माजी जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख यांच्यासह संत-महंत, महाराज मंडळी, नगराध्यक्ष, नगरसेवक, नगरसेविका, भाजपचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि असंख्य भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संतांचे आशीर्वाद हीच समाजकार्यासाठी खरी प्रेरणाशक्ती असून कार्यकर्त्यांचा सन्मान ही संघटनेची खरी ओळख आहे, हा संदेश या सोहळ्यातून देण्यात आला. अध्यात्म, संस्कार, संघटन आणि कार्यकर्त्यांप्रती कृतज्ञता यांचा सुंदर संगम या कार्यक्रमातून अनुभवायला मिळाला. संत-महंतांच्या आशीर्वादाने आणि उपस्थितांच्या सहकार्याने समाजसेवा व विकासाचा संकल्प अधिक दृढ करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. भक्ती, श्रद्धा आणि कार्यकर्त्यांच्या सन्मानाने हा सोहळा उपस्थितांसाठी अविस्मरणीय ठरला.

चिखलसांगी येथे शेतात आढळला सहा फूट लांबीचा अजगर

सर्पमित्रांनी अवघ्या दहा मिनिटांत केले रेस्क्यू

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मोर्शी – तालुक्यातील चिखलसावंगी गावातील विनोद इंगळे यांच्या शेतात बुधवारी, ११ नोव्हेंबर रोजी सुमारे सहा फूट लांबीचा भला मोठा अजगर आढळून आला.

शेतात मजूर काम करीत असताना अचानक अजगर दिसल्याने एकच खळबळ उडाली. त्यामुळे शेतातील मजुरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

ही माहिती मिळताच विनोद इंगळे यांनी क्षणाचाही विलंब न करता सर्पमित्र हर्ष गलपट यांच्याशी संपर्क साधला. माहिती मिळताच सर्पमित्र हर्ष गलपट यांच्यासह अभिषेक खडसे, विजय फुसे आणि लक्की कुसरे यांनी अवघ्या दहा मिनिटांत घटनास्थळी धाव घेतली.

सर्पमित्रांच्या पथकाने अत्यंत सावधगिरीने सहा फूट लांबीच्या अजगराला सुरक्षितपणे पकडले. त्यानंतर त्याला नैसर्गिक अधिवास असलेल्या जंगलात सुरक्षितपणे सोडून देण्यात आले. सर्पमित्रांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे संभाव्य धोका टळला असून, त्यांच्या कार्याचे परिसरात कौतुक होत आहे.

मोर्शी तालुक्यातील सर्व गावकऱ्यांनी आपल्या परिसरात साप किंवा कोणताही जखमी वन्यप्राणी आढळल्यास त्याला मारण्याचा किंवा स्वतः पकडण्याचा प्रयत्न करू नये.


तातडीने सर्पमित्र हर्ष गलपट यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

संपादकीय

शिवरायांच्या शौर्याची साक्ष देणारी ऐतिहासिक वाघनखे मुंबईत

इतिहासाचे स्मरण म्हणजे केवळ भूतकाळाची उजळणी नव्हे, तर वर्तमानाला प्रेरणा आणि भविष्याला दिशा देण्याचे सामर्थ्य! छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचे आराध्य दैवत नाहीत, तर ते संपूर्ण देशाच्या स्वाभिमानाचे, शौर्याचे, दूरदृष्टीचे आणि कुशल नेतृत्वाचे प्रतीक आहेत. त्यांच्या पराक्रमाच्या असंख्य गाथा आजही प्रत्येक मराठी माणसाच्या मनात चैतन्य निर्माण करतात. अशाच इतिहासातील एका महत्त्वपूर्ण पर्वाची आठवण करून देणारी शिवरायांशी संबंधित ऐतिहासिक वाघनखे आजपासून मुंबईकरांना पाहण्याची संधी उपलब्ध होत आहे. ही केवळ एक ऐतिहासिक वस्तू पाहण्याची संधी नसून आपल्या गौरवशाली इतिहासाशी नव्याने नाते जोडण्याची सुवर्णसंधी आहे.

लंडनमधील व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट संग्रहालयातून तीन वर्षांच्या कराराने महाराष्ट्रात आणण्यात आलेल्या या वाघनखांचे प्रदर्शन आता मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयात आयोजित करण्यात येत आहे. सातारा, नागपूर आणि कोल्हापूरनंतर आता मुंबईतही हा ऐतिहासिक ठेवा नागरिकांसाठी उपलब्ध होत आहे. त्यामुळे मुंबईकरांसह राज्यातील इतिहासप्रेमींसाठी ही निश्चितच आनंदाची बाब आहे. सन १६५९ मध्ये प्रतापगडाच्या पायथ्याशी छत्रपती शिवाजी महाराज आणि अफजलखान यांची ऐतिहासिक भेट झाली. या प्रसंगातून महाराजांनी दाखवलेले धैर्य, प्रसंगावधान, रणनीती आणि आत्मविश्वास आजही नेतृत्वाचा आदर्श मानले जातात. या ऐतिहासिक घटनेशी संबंधित म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वाघनखांचे महत्त्व केवळ त्यांच्या भौतिक अस्तित्वात नाही, तर त्या काळातील संघर्ष, स्वराज्याची प्रेरणा आणि स्वाभिमानाच्या भावनेशी जोडलेले आहे. मात्र या वाघनखांच्या ऐतिहासिक अस्सलतेबाबत काही इतिहास संशोधकांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यामुळे या विषयाकडे भावनिकतेसोबतच ऐतिहासिक पुरावे, संशोधन आणि वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून पाहणेही तितकेच आवश्यक आहे. इतिहास हा श्रद्धेचा विषय असला तरी त्याची मांडणी पुराव्यांच्या आधारावर होणे ही अभ्यासकांची आणि शासनाची जबाबदारी आहे. प्रदर्शनाच्या माध्यमातून या वाघनखांचा प्रवास, त्यांचा ऐतिहासिक संदर्भ आणि उपलब्ध संशोधन यांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवली गेली, तर या उपक्रमाचे महत्त्व अधिक वाढेल. आजच्या डिजिटल युगात नवीन पिढी इतिहासापासून काहीशी दूर जात असल्याची चिंता व्यक्त केली जाते. अशा परिस्थितीत संग्रहालयातील ऐतिहासिक वस्तू प्रत्यक्ष पाहण्याची संधी विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाचे नवे दालन उघडू शकते. शाळा-महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या ऐतिहासिक सहलींचे आयोजन करून त्यांना शिवकालीन इतिहासाची ओळख करून द्यावी. कारण इतिहास केवळ पाठ्यपुस्तकात वाचण्याची गोष्ट नाही, तर तो अनुभवण्याची आणि त्यातून प्रेरणा घेण्याची बाब आहे. यासोबतच महाराष्ट्र शासनाने या ऐतिहासिक ठेव्याच्या जतनासाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. परदेशातील संग्रहालयांमध्ये असलेल्या भारताच्या ऐतिहासिक वारशाचा शोध घेऊन तो कायमस्वरूपी मायभूमीत आणण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न व्हायला हवेत. तीन वर्षांच्या प्रदर्शनापुरते समाधान न मानता अशा ऐतिहासिक वस्तूंच्या कायमस्वरूपी पुनरागमनासाठी राजनैतिक आणि सांस्कृतिक पातळीवर प्रयत्न होणे गरजेचे आहे.



मोठे होण्यासाठी मोठी स्वप्ने पाहण्यापेक्षा, ती पूर्ण करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणे अधिक महत्त्वाचे असते.

पाण्याचे संकट दारात : आता तरी जागे व्हा!

अप्पर वर्धा धरणातील घटता जलसाठा धोक्याची घंटा; पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे मोल ओळखण्याची वेळ! पाणी म्हणजे जीवन, पाणी म्हणजे शेती, पाणी म्हणजे अर्थव्यवस्था आणि पाणी म्हणजे भविष्य!

अस्तित्वासाठी पाणी जितके आवश्यक आहे, तितकेच ते एखाद्या प्रदेशाच्या विकासासाठीही महत्त्वाचे आहे. मात्र दुर्दैवाने पाण्याचे महत्त्व आपल्याला अनेकदा संकट समोर उभे ठाकल्यानंतरच जाणवते. पावसाळ्यात पाण्याचा मुक्तपणे वापर करणारा समाज उन्हाळा जवळ आला की पाण्याच्या थेंबासाठी धावपळ करताना दिसतो. ही परिस्थिती केवळ निसर्गाची देणगी किंवा अवकृपा नसून आपल्या नियोजनातील त्रुटींचेही प्रतिबिंब आहे. अमरावती जिल्ह्याची जीवनवाहिनी मानल्या जाणाऱ्या अप्पर वर्धा धरणातील घटता जलसाठा ही अशीच एक गंभीर बाब असून संपूर्ण परिसरासाठी धोक्याची घंटा ठरत आहे.

चित्रातील माहितीनुसार धरणातील जलसाठा ४१ टक्क्यांवर आल्याची बाब चिंताजनक आहे. कारण हा जलसाठा केवळ धरणातील पाण्याची पातळी दर्शविणारा आकडा नाही, तर लाखो नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा, शेतकऱ्यांच्या शेतीचा आणि आगामी उन्हाळ्यातील जीवनमानाचा प्रश्न त्याच्याशी जोडलेला आहे. आज या परिस्थितीकडे गांभीर्याने पाहिले नाही, तर भविष्यात पाणीटंचाईचे संकट अधिक तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही.


अप्पर वर्धा धरणाचे महत्त्व अनन्यसाधारण!

अमरावती जिल्ह्यातील अप्पर वर्धा धरण हे केवळ जलसाठ्याचे साधन नाही, तर या संपूर्ण परिसराच्या विकासाचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, शेतीसाठी सिंचन, औद्योगिक गरजा आणि ग्रामीण भागातील पाण्याचे नियोजन अशा अनेक बाबींसाठी या धरणाचे महत्त्व मोठे आहे. धरणातील पाण्यावर अनेक गावांचे आणि शहरांचे जीवन अवलंबून आहे.

विशेषतः अमरावती जिल्ह्यातील वरूड, मोर्शी आणि आसपासच्या परिसरातील शेतीचा विचार केला, तर पाण्याचे महत्त्व अधिक प्रकर्षाने जाणवते. हा परिसर संत्रा उत्पादक म्हणून ओळखला जातो. संत्रा हे केवळ एक फळपीक नसून हजारो शेतकरी कुटुंबांच्या अर्थकारणाचा मुख्य आधार आहे. संत्रा बागा उभ्या करण्यासाठी शेतकरी वर्षानुवर्षे मेहनत घेतात. झाडांची निगा, खतांचा वापर, औषधफवारणी, मजुरी आणि सिंचन यासाठी मोठा खर्च करावा लागतो. अशा परिस्थितीत पाण्याची उपलब्धता कमी झाली, तर त्याचा थेट परिणाम संत्रा उत्पादकांच्या आर्थिक स्थितीवर होतो.

संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसमोर नवे संकट!

वरूड-मोर्शी तालुक्याची ओळख संत्र्यामुळे केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर देशभरात निर्माण झाली आहे. येथील संत्रा बागा हजारो शेतकऱ्यांच्या कष्टाचे प्रतीक आहेत. मात्र बदलते हवामान, अनियमित पाऊस, वाढता उत्पादन खर्च, बाजारभावातील चढ-उतार आणि पाण्याची अनिश्चितता यामुळे संत्रा उत्पादक शेतकरी आधीच अनेक संकटांचा सामना करीत आहेत.



त्यातच धरणातील जलसाठा कमी होण्याची परिस्थिती निर्माण झाली, तर आगामी उन्हाळ्यात बागा जगविण्याचे मोठे आव्हान शेतकऱ्यांसमोर उभे राहू शकते. संत्र्याच्या झाडांना योग्य वेळी पाणी मिळाले नाही, तर त्याचा परिणाम झाडांच्या वाढीवर आणि उत्पादनक्षमतेवर होऊ शकतो. अनेक वर्षे जपलेल्या बागा वाचविण्यासाठी शेतकऱ्यांना मोठी धडपड करावी लागते.

शेतकऱ्यांच्या या परिस्थितीकडे केवळ एक कृषी समस्या म्हणून पाहून चालणार नाही. संत्रा उत्पादनाशी मजूर, वाहतूकदार, व्यापारी, कृषी सेवा केंद्रे आणि बाजारपेठेतील अनेक घटक जोडलेले आहेत. त्यामुळे संत्रा बागांवर आलेले संकट संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेला प्रभावित करू शकते.

पावसावर अवलंबून राहण्याची मानसिकता बदलावी!

दरवर्षी पावसाळा आला की धरणे भरतील, नद्या दुथडी भरून वाहतील आणि पाण्याची समस्या दूर होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जाते. मात्र पावसाचे प्रमाण आणि त्याचे वितरण यामध्ये मोठी अनिश्चितता निर्माण झाली आहे. कधी अतिवृष्टी, तर कधी पावसाचा मोठा खंड, कधी अवकाळी पाऊस, तर कधी पावसाळ्याच्या अखेरीसही अपेक्षित पाऊस न होणे, अशा परिस्थितीचा सामना करावा लागत आहे.

हवामानातील बदलांचा विचार करता केवळ पावसावर अवलंबून राहून चालणार नाही. उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन, पावसाच्या पाण्याचे संकलन, भूजल पातळी वाढविणे आणि जलसंधारणाच्या उपाययोजना यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.

गावागावांत शेततळी, बंधारे, नाला खोलीकरण, गाळ काढणे आणि पाणी अडविण्याच्या कामांना गती मिळाली पाहिजे. पावसाचे पाणी वाहून जाण्याऐवजी जमिनीत मुरेल, यासाठी व्यापक प्रयत्न व्हायला हवेत. पाण्याचे नियोजन केवळ सरकारी योजनांमधून होणार नाही, तर त्यासाठी लोकसहभागही तितकाच महत्त्वाचा आहे.

प्रशासनाने आताच ठोस पावले उचलावीत!

धरणातील जलसाठा कमी होत असल्याचे चित्र स्पष्ट होत असताना प्रशासनाने भविष्यातील परिस्थितीचा अंदाज घेऊन पाण्याचे नियोजन करणे आवश्यक आहे. पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देतानाच शेती आणि इतर गरजांसाठी उपलब्ध पाण्याचे वस्तुनिष्ठ नियोजन केले पाहिजे.

धरणातील उपलब्ध पाण्याचा सध्याचा साठा, अपेक्षित पाणीवापर, उन्हाळ्यापर्यंतची संभाव्य गरज आणि पावसाळा सुरू होईपर्यंतचा कालावधी यांचा विचार करून स्पष्ट आराखडा तयार करावा. पाणीवाटपाचे वेळापत्रक आणि उपलब्धतेची माहिती नागरिकांना नियमितपणे दिली पाहिजे.

स्थानिक लोकप्रतिनिधींनीही या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. पाणी हा राजकारणाचा विषय बनण्याऐवजी सर्वपक्षीय सहकार्याचा विषय झाला पाहिजे. धरणातील जलसाठा, पाणीवाटप, सिंचन आणि पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नावर लोकप्रतिनिधींनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करावा.

विशेषतः संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन कृषी विभाग आणि जलसंपदा विभागाने समन्वयाने काम करावे. पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण झाल्यास शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन आणि आवश्यक मदत उपलब्ध करून देण्यासाठी पूर्वतयारी असावी.

पाणी वाचविणे ही प्रत्येकाची जबाबदारी!

पाणीटंचाईसाठी केवळ प्रशासनाला जबाबदार धरून नागरिकांची जबाबदारी संपत नाही. पाण्याचा अपव्यय रोखणे ही प्रत्येक नागरिकाची नैतिक जबाबदारी आहे. घरातील नळ सुरू ठेवणे, वाहन धुण्यासाठी अनावश्यक पाणी वापरणे, पाण्याची गळती दुर्लक्षित करणे किंवा सार्वजनिक ठिकाणी पाण्याचा अपव्यय करणे या छोट्या वाटणाऱ्या गोष्टींचा एकत्रित परिणाम मोठा असतो.

शहरांमध्ये पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था अधिक प्रभावी केली पाहिजे. घरांच्या छतावरील पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्याची व्यवस्था केली, तर भूजल पातळी वाढविण्यास मदत होऊ शकते. ग्रामीण भागातही विहिरी, बोअरवेल आणि जलस्रोतांचे पुनर्भरण करण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांनीही शक्य तेथे ठिबक सिंचन आणि तुषार सिंचनाचा वापर वाढवावा. पारंपरिक पद्धतीने मोठ्या प्रमाणात पाणी वापरण्याऐवजी उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करण्याची गरज आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार केल्यास पाण्याची बचत करतानाच शेतीचा खर्च कमी करण्यास मदत होऊ शकते.

आजचे नियोजनच उद्याचे भविष्य ठरविणार!

आज अप्पर वर्धा धरणातील घटता जलसाठा आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देत आहे. पाणी मुबलक असताना त्याचे नियोजन करण्याची गरज सर्वांना वाटत नाही. मात्र संकट निर्माण झाल्यानंतर उपाययोजना करण्याची धावपळ सुरू होते. ही मानसिकता बदलण्याची वेळ आली आहे.

पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर टँकर सुरू करणे, विहिरींची व्यवस्था करणे किंवा तात्पुरत्या उपाययोजना करणे यापेक्षा पाणीटंचाई निर्माणच होऊ नये, यासाठी दीर्घकालीन नियोजन करणे अधिक शहाणपणाचे आहे. प्रत्येक गावाने आपला जलआराखडा तयार करावा. प्रत्येक शहराने पाणी बचतीचे धोरण स्वीकारावे. प्रत्येक शेतकऱ्याने पाण्याचा काटकसरीने वापर करावा आणि प्रत्येक नागरिकाने पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे महत्त्व ओळखावे.

आपल्याकडे गड-किल्ल्यांचा ऐतिहासिक वारसा आहे, समृद्ध शेती आहे, मेहनती शेतकरी आहेत आणि निसर्गाने दिलेली संपत्ती आहे. मात्र या सर्व गोष्टींचे संवर्धन करण्यासाठी पाण्याचे नियोजन आवश्यक आहे. पाणी असेल तर शेती फुलेल, शेती फुलली तर ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट होईल आणि ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम झाली तरच खऱ्या अर्थाने विकास साधता येईल.

अप्पर वर्धा धरणातील घटता जलसाठा ही केवळ आकडेवारी नाही, तर भविष्यातील संकटाची पूर्वसूचना आहे. आज पाण्याचे महत्त्व ओळखून त्याचे योग्य नियोजन केले, तर उद्याचा उन्हाळा सुसह्य होऊ शकतो. अन्यथा पाण्याच्या प्रत्येक थेंबासाठी संघर्ष करण्याची वेळ येऊ शकते. त्यामुळे आता तरी जागे होण्याची गरज आहे. धरणातील पाणी वाचविणे, भूजल पातळी वाढविणे आणि उपलब्ध जलसंपत्तीचे योग्य व्यवस्थापन करणे ही केवळ शासनाची जबाबदारी नाही, तर संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

पाणी अडवा, पाणी जिरवा... पण त्यासोबत पाणी जपण्याची संस्कृतीही रुजवा! कारण आज पाणी वाचविले, तरच उद्याची तहान भागविता येईल!

बांधापासून महामार्गापर्यंतचा विकास प्रवास!



या दिवाळीत आपण केवळ आपल्या घरात दिवे लावू नयेत, तर एखाद्या गरजूच्या आयुष्यातही आनंदाचा दिवा लावूया. शेतकऱ्याच्या कष्टाचा सन्मान करूया, महिलांच्या स्वप्नांना बळ देऊया, तरुणांच्या आकांक्षांना संधी देऊया आणि आपल्या महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी एकत्र येऊया. दिवाळी हा केवळ दिव्यांचा आणि रोषणाईचा सण नाही, तर आपल्या आयुष्यातील दुःख, अडचणी आणि संकटांवर मात करून नव्या उमेदीने पुढे जाण्याची प्रेरणा हा सण देतो. मी जेव्हा बांधापासून महामार्गापर्यंत महाराष्ट्राचा कसा विकास झाला असं म्हणतो तेव्हा अर्थातच माझं पहिलं प्राधान्य हे आपल्या अन्नदात्याच्या म्हणजे शेतकऱ्यांच्या बांधाला आहे. काळी दिवाळी होऊ देणार नाही : दिवाळी आनंदात साजरी करत असताना शेतकऱ्याच्या घरावर दुष्काळाचे सावट आहे हे आपण विसरता कामा नये. कारण शेवटी शेतकरी आनंदी तर सगळी अर्थव्यवस्था आनंदी. त्याच्या कष्टावर आपले अन्नधान्य, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि समाजाचे जीवन अवलंबून आहे. कोविडच्या भयानक साथीमध्ये आपण याचा अनुभव घेतला आहे. गेली दोन-तीन वर्ष अतिवृष्टीमुळे त्रासून गेलेला शेतकरी सध्या दुष्काळात होरपळून निघाला आहे. निसर्गाच्या लहरीपणापुढे कोणाचं काय चालणार? म्हणूनच शेतकऱ्याला केवळ मदत देऊन थांबणे पुरेसे नाही, तर त्याला संकटातून कायमस्वरूपी बाहेर काढणे गरजेचे आहे हे ओळखून महायुती सरकारने पूर्ण तयारीनिशी पावले उचलली आहेत. दुष्काळ पडल्यामुळे सरकारी चौकटीत जे जे काही करण्यासारखं आहे ते तर करतोच आहोत, शिवाय एक जबाबदार पक्ष म्हणून आज प्रत्येक शिवसैनिक शेतकऱ्याच्या बांधावर पोहोचला आहे. शेतकऱ्यांची दिवाळी काळी होऊ देणार नाही हा निर्धार करून त्यांना आम्ही मोफत धान्याचे लाखो कीट दिले आहे, स्वयंरोजगारासाठी शेतकरी महिलांना शिलाई मशीन, त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप केले आहे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक – चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

मुसळखेडा हनुमान पेठच्या श्री संत सदगुरु योगीराज महाराज यांच्या

प्रथम पुण्यतिथी महोत्सव व विश्वशांती अखंड हरिनाम सप्ताहाला रविवारपासुन सुरुवात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

चांदस वाठोडा – येथुन जवळच असलेल्या मुसळखेडा हनुमान पेठ येथील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान श्री संत सदगुरु योगीराज महाराज यांच्या प्रथम पुण्यतिथी महोत्सव व विश्वशांती अखंड हरिनाम सप्ताहाला येत्या १५ नोव्हेंबर पासुन सुरुवात होत आहे. या कार्यक्रमांतर्गत गोकुलधाम येथील ह.भ.प.वैभवश्री जी यांचे श्रीमद भागवत कथा प्रवचन सुध्दा होणार आहे.

या सप्ताहांतर्गत विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून त्या अंतर्गत दैनंदिन कार्यक्रमांतर्गत पहाटे ५ ते ६ काकडा आरती, सकाळी ७ वाजता गाथा पारायण, दुपारी ११ वाजता भजन, दररोज दुपारी १ ते ५ गोकुलधाम येथील ह.भ.प.वैभवश्री जी यांचे श्रीमद भागवत कथा प्रवचन, सायंकाळी ५ वाजता हरिपाठ, रात्री ६ वाजता हरिकिर्तन, राष्ट्रवंदना, रात्री ८ वाजता संतभोजन आणि रात्री ९ वाजता हरी जागर होणार आहे. १५ ते २१ नोव्हेंबर दरम्यान दररोज रात्री ६ वाजता अनुक्रमे अश्विनी गुडधे मुसळखेडा यांच्या सौजन्याने ह.भ.प.मंगेश महाराज गावंडे वाठोडा (आळंदीकर), सुमित्रा प्रदीप अकर्ते यांच्या सौजन्याने ह.भ.प.रमेश महाराज दुधे (यवतमाळ), स्व.शेषरावजी गोडबोले यांच्या स्मृति प्रित्यर्थ नरेश गोडबोले यांच्या सौजन्याने ह.भ.प.सुमित महाराज मेश्राम (अमरावती), भारती कंठक औरंगाबाद यांच्या सौजन्याने ह.भ.प.बालकिर्तनकार सोहम महाराज सातपुते (बीड), पुजा गुडधे काटोल यांच्या सौजन्याने ह.भ.प.अजय महाराज महाजन (वाशिम), डॉ.प्रियंका नेरेकर यांच्या सौजन्याने ह.भ.प.गोविंद महाराज नाईकवाडे (बीड), योगिता ठाकरे वर्धा यांच्या सौजन्याने ह.भ.प.वैभवी श्री जी (गोकुलधाम) यांचे किर्तन होणार आहे.

रविवारी २२ नोव्हेंबरला सकाळी ११ वाजता



डॉ.भुषण खोले व डॉ.शुभांगी खोले यांचे वतीने महाराष्ट्रातील सुप्रसिध्द किर्तनकार ह.भ.प.विशाल महाराज खोले यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. त्यानंतर दुपारी २ वाजता काला व महाप्रसाद वितरीत केल्या जाणार आहे.

१५ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजता शोभायात्रा व ग्रंथदिंडी श्री संत सदगुरु योगीराज महाराज देवस्थान येथुन श्रींच्या चरण पादुकांसह काढून व सकाळी ९ वाजता पताका, पुजन, विना पुजन, कलश पुजन डॉ.भुषण खोले व डॉ.शुभांगी खोले यांचे हस्ते करण्यात येणार आहे. या शोभायात्रा व ग्रंथदिंडीमध्ये यशवंत महिला मंडळ वाठोडा, जय भवानी दुर्गा महिला भजन मंडळ, मॉ नर्मदा भजन मंडळ, माऊली महिला भजन मंडळ, गुरुदेव महिला सेवा मंडळ, जनाई महिला भजन मंडळ, श्री दादाजी भक्त भजन मंडळ, ग्रामपंचायत चांदस व वाठोडा, मुसळखेडा व समस्त ग्रामवासी मोठया संख्येने सहभागी होणार आहे. हरिपाठ, किर्तन, साथसंगत ह.भ.प.राजु महाराज अढाऊ, ह.भ.प.नितीन महाराज मेने, ह.भ.प.विपीन महाराज महल्ले, ह.भ.प.निकेश महाराज सावनकर, ह.भ.प.कौशल महाराज महल्ले, ह.भ.प.दिनेश काकडे, ह.भ.प.निलेश परतेती, प्रणय सावनकर व संचाची लाभणार आहे.

य ेण ा र ्य ा निरनिराळया गावच्या दिंडया व पालखीची नोंद करुन नारळ व प्रमाणपत्र देण्यात येणार असून याकरीता ग्रामगीता प्रचारक हरिभाऊ झोड (मोबा.९४२२५४४१४३) व बोकडे महाराज यांचेशी तसेच या संपुर्ण पुण्यतिथी महोत्सव व विश्वशांती अखंड हरिनाम सप्ताहा संदर्भात निलेश मगर्दे (९७६६५०२००१), ऋषीकेश देशमुख (९८९०७३८२०१), विठठलराव गावंडे (७३५०७६७१४३), सुरेखा गायकी (८४५९८४८६७८), डॉ.रामकिशन गोस्वामी (९६६५२६३७९६), रविंद्र काळे (९५६१५६८७९४), चंदा बारस्कर (९७३०२११७४२) यांचेशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या श्री संत सदगुरु योगीराज महाराज यांच्या प्रथम पुण्यतिथी महोत्सव व विश्वशांती अखंड हरिनाम सप्ताहाला भाविकांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री संत सदगुरु योगीराज महाराज देवस्थानच्या वतीने एका प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांच्या कार्यालयातून राष्ट्रवादीच्या आमदारांना फोन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई – राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलिनीकरणाच्या चर्चेने पुन्हा वेग घेतला असून, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या कार्यालयातून त्यांच्या पक्षातील आमदारांना फोन करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी



दिली आहे. या फोनद्वारे विलिनीकरणाबाबत आमदारांची भूमिका जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे समजते. दोन्ही राष्ट्रवादीतील ज्येष्ठ नेत्यांच्या भेटीगाठी आणि अलीकडील विधानांमुळे विलिनीकरणाच्या चर्चेला पुन्हा चालना मिळाली आहे. सुनेत्रा पवार यांनीही यासंदर्भात 'जशी वेळ येईल, तशा गोष्टी कळतील', असे सूचक विधान केले होते. त्यानंतर त्यांच्या कार्यालयातून पक्षातील आमदारांशी संपर्क साधण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे विलिनीकरणाच्या मुद्द्यावर पक्षांतर्गत मत जाणून घेण्याची प्रक्रिया सुरू झाल्याची चर्चा आहे. काही दिवसांपूर्वी सुनेत्रा पवार यांच्या राष्ट्रवादीतील काही आमदार शरद पवार यांची भेट घेणार असल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली होती.

फटाक्यांच्या वादावरून तरुणावर हल्ला : तिघांना अटक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

पुणे – दिवाळीत फटाके उडविण्यावरून झालेल्या वादातून विमाननगर परिसरात तिघांनी एका २२ वर्षीय तरुणाला दांडक्याने बेदम मारहाण केली. या हल्ल्यात अमन शेख गंभीर जखमी झाला. याप्रकरणी विमानतळ पोलिसांनी खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करून तिघांना अटक केली आहे. राम नवले (१९), तेजस शिंदे (२०) आणि सम्यक साळवी (१८) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. विमाननगरमधील रोझ गार्डन सोसायटी रस्त्यावर अमन आणि त्याचे मित्र फटाके उडवत होते. दरम्यान, गुरुवार पेठेतील पंचहौद मिशनजवळील भंडारी वाड्याला फटाक्यामुळे आग लागली. मोडकळीस आलेल्या या वाड्यात कोणीही राहत नव्हते. अरुंद गल्लीतील दाट वस्तीत असलेल्या वाड्याची संभाव्य पडझड लक्षात घेऊन वीजपुरवठाही खंडित करण्यात आला.

ट्रकने खासगी बसला २०० मीटर फरफटत नेले अन... ३८ प्रवासी जखमी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

रत्नागिरी –मुंबई–गोवा महामार्गावर भीषण अपघाताची घटना घडली आहे. लांजा तालुक्यातील अंजणारी पुलावर शुक्रवारी (दि.१३ नोव्हेंबर) पहाटे भरधाव ट्रकने खासगी आराम बसला जोरदार धडक दिली. या अपघातात बस महामार्गावर उलटून तब्बल २०० मीटरपर्यंत फरफटत गेली. अपघाताच्या वेळी बसमधील बहुतांश प्रवासी झोपेत असल्याने एकच गोंधळ



उडाला. या दुर्घटनेत तब्बल ३८ प्रवासी जखमी झाले असून, त्यापैकी आठ जणांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती समोर आली आहे. नेमका अपघात कसा घडला ? मिळालेल्या माहितीनुसार, विरार येथून प्रवाशांना घेऊन एक खासगी आराम बस मालवणच्या दिशेने जात होती. त्याचवेळी राजस्थानहून महिंद्रा कंपनीच्या वाहनांचे स्पेअर पार्ट्स घेऊन एक ट्रक गोव्याच्या दिशेने निघाला होता. दोन्ही वाहने अंजणारी पुलावर आली असताना ट्रकचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यानंतर भरधाव ट्रकने पुढे जाणाऱ्या आराम बसला मागून दोन वेळा जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता एवढी मोठी होती की बस महामार्गावर उलटली आणि सुमारे २०० मीटरपर्यंत फरफटत गेली.

छटपुजेच्या नावाखाली उल्हास नदीपात्रात मातीचा भराव

शासनाकडून ब्लू लाईनची घोषणा, तरीही प्रशासन गप्प का? बदलापुरात संतापाचा उद्रेक!

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई – बदलापुरात उल्हास नदीकाठी आयोजित केल्या जाणाऱ्या छटपूजेला मनसेने विरोध दर्शविला.

आता त्या पाठोपाठ उल्हास नदी बचाव समिती आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून देखील आक्षेप घेतला जातोय. सध्या बदलापुरात छटपूजेच्या नावाखाली




उल्हास नदी पात्रात शेकडो ब्रास मातीचा भराव टाकला जातोय. विशेष म्हणजे इतक्या मोठ्या प्रमाणात मातीचा भराव टाकण्याचं काम सुरू असताना याची माहिती महसूल अधिकाऱ्यांना नसल्याचा दावा उल्हास नदी बचाव कृती समितीने केला. मागील आठवड्यात याच उल्हास नदी परिसरात कोकण महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कोकण महोत्सवाला मिळणारा प्रतिसाद लक्षात घेता आयोजकांनी वाढीव मुदत मागितली. मात्र प्रस्तावित छटपूजेसाठी प्रशासनाने वाढीव मुदत नाकारली. असा आरोप यावेळी करण्यात आला. मग छटपूजेसाठी इतका अटहास कशासाठी? असा देखील सवाल उपस्थित केला जातोय.

अकोलेकरांची पाण्याची चिंता मिटवण्यासाठी १३२ कोटींचा प्लॅन!

मोर्णा धरणातून २५.२० किलोमीटर जलवाहिनीला प्रशासकीय मान्यता

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

अकोला – अकोल्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी आता मोर्णा धरणाचं पाणी शहरात आणण्याची तयारी सुरू झाली आहे. मोर्णा धरण ते महान जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत २५ किलोमीटर २०० मीटर लांबीची जलवाहिनी टाकण्याला शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. तब्बल ८७ कोटी ६७ लाख रुपये खर्चाच्या या प्रकल्पाचं काम तीन महिन्यांत पूर्ण करण्याचं नियोजन आहे. यासोबतच टँकरद्वारे पाणीपुरवठा, जलशुद्धीकरण केंद्राची क्षमता वाढवणे आणि नवीन संप उभारण्यासह १३२ कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या उपाययोजना आखण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या उपाययोजनांना मान्यता



दिल्याची माहिती आमदार रणधीर सावरकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. २५.२० किलोमीटर जलवाहिनीला प्रशासकीय मान्यता, पाणी थेट महान येथील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत आणलं जाणार कोटेपूर्णा धरणातील मर्यादित ज ल स ा ठ च ा म ुळे अकोलेकरांसमोर निर्माण झालेलं पाणीसंकट, या पार्श्वभूमीवर आता मोर्णा धरणातून पाणी आणण्याचा पर्याय पुढे आला आहे. मोर्णा प्रकल्पात सध्या ६१.८६ टक्के म्हणजेच २५.६५ दलघमी जलसाठा उपलब्ध आहे. या पाण्याचा उपयोग अकोला शहरासाठी करण्याच्या दृष्टीने २५.२० किलोमीटर लांबीची जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. मोर्णा धरणावर फ्लोटिंग प्लॅटफॉर्म उभारून २०० अश्वशक्तीचे सात सबमर्सिबल पंप बसवले जाणार आहेत. या माध्यमातून पाणी थेट महान येथील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत आणलं जाणार आहे.

उ प ा य य ो ज ना तपशील मोर्णा जलवाहिनी २५.२० किमी, मोर्णा प्रकल्प खर्च८७.६७ कोटी, सबमर्सिबल पंप ७, पंप क्षमता २०० कझ प्रत्येकी, अकोट केंद्र क्षमता वाढ २० टक्के, टँकर व्यवस्था ४४.४० कोटी, एकूण नियोजित खर्च १३२ कोटींहून अधिक, जलशुद्धीकरण केंद्राची क्षमता २० टक्क्यांनी वाढवण्यात येणार, दरम्यान, अकोल्याच्या पाणीपुरवठा व्यवस्थेवरील ताण कमी करण्यासाठी पर्यायी व्यवस्थाही उभारली जाणार आहे. अकोट येथील जलशुद्धीकरण केंद्राची क्षमता २० टक्क्यांनी वाढवण्यात येणार असून, अकोट फैल आणि रेल्वे स्टेशन परिसरात प्रत्येकी एक संप उभारला जाणार आहे. अकोट येथून दररोज चार एमएलडी पाणी आणण्यासाठी २५ हजार लिटर क्षमतेचे ४० टँकर वापरण्यात येणार आहेत. तर शहरातील हायड्रंटच्या माध्यमातून २० टँकरद्वारे १८० दिवस पाणीपुरवठा केला जाणार आहे. या टँकर व्यवस्थेसाठी ४४ कोटी ४४ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे.

महात्मा फुले महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन सोहळा

दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी १९९४-९५ च्या बॅचचा परिवारासह आनंद मेळावा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

वरुड – स्थानिक महात्मा फुले कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता बारावीच्या १९९४-९५ च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन सोहळा यंदाही मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात पार पडला. दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे ९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता स्थानिक आयएमए हॉल येथे या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. विशेष म्हणजे, २००८ पासून सुरु झालेली ही स्नेहमिलनाची परंपरा तब्बल १८ वर्षांपासुन अविरतपणे जपली जात आहे. या स्नेहमिलन सोहळ्यात जुन्या आठवणींना उजाळा देत मित्रांनी एकमेकांशी



मनमोकळ्या गप्पा मारल्या. यावेळी संगीत खुर्ची, कराओके गायन तसेच विविध मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सर्व माजी विद्यार्थी आपल्या परिवारासह सहभागी झाल्याने कार्यक्रमाला कौटुंबिक स्नेहमेळाव्याचे स्वरुप प्राप्त झाले होते. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ.प्रवीण चौधरी, डॉ.अश्विन जनईकर, अमोल खासबागे, दिनेश घोरमाडे, संदीप दवंडे, मनोज गुल्हाने, मनोज पांडव, नितीन तरार, आनंद गुडधे, ॲड.शशिकांत उमेकर, डॉ.योगेश ढोबळे, हेमंत गडवे, चंदन भागवत, योगेश आंडे, सचिन डाफे, डॉ.प्रफुल डहाके, ईश्वर राऊत, आशिष इंगळे यांच्यासह १९९४-९५ च्या बॅचमधील सर्व मित्रपरिवाराने विशेष सहभाग नोंदविला.

मैत्री, आपुलकी आणि जुन्या आठवणींचा ठेवा जपत १८ वर्षांपासून सुरु असलेली ही स्नेहमिलनाची परंपरा भविष्यातही अशीच अखंड सुरु राहावी, अशी भावना यावेळी सर्व मित्रांनी व्यक्त केली.

शासकीय योजनांतून आदिवासींचा संपूर्ण विकास साधणार : महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

पालकमंत्र्यांच्या हस्ते जनजातीय गौरव दिवस सेवा सप्ताहाचा शुभारंभ

निमकुंड गावाच्या विकासाठी ४ कोटी निधींची घोषणा

पालकमंत्र्यांनी अशोक आठवले यांच्या घरी केला दिवाळीचा फराळ

(प्रतिनिधी वरुड दर्पण)







अमरावती – निमकुंडसह मेळघाटातील सर्व आदिवासी कुटुंबापर्यंत क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१व्या जयंती निमित्त राबविण्यात येत असलेल्या सेवा सप्ताहात केंद्र व राज्य शासनाच्या सर्व योजनांचा लाभ पोचविण्यात येणार आहे.निमकुंड गावासाठी ३.४४ कोटी खर्चातून पिण्याच्या पाण्याच्या योजनेला मंजुरी देण्यात येईल व ५० लाखांच्या निधीतून या गावात विविध विकास कामे राबविण्यात येतील असे प्रतिपादन महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज येथे केले.

या गावातील अशोक चिताराम आठवले यांच्या घरी पालकमंत्र्यांनी दिवाळीचा फराळ केला व शेतकऱ्यांसोबतच शासन आदिवासींच्या पाठीशीही खंबीरपणे उभे असल्याचा संदेश त्यांनी दिला.

अचलपूर तालुक्यातील दुर्गम व आदिवासी निमकुंड गावात पालकमंत्री बावनकुळे यांनी आदिवासी बांधवांसोबत दिवाळी साजरी करून गृहोपयोगी साहित्याचे वाटप केले आणि जिल्ह्यात 'जनजातीय गौरव दिवस सेवा सप्ताहा'चा शुभारंभ त्यांच्या हस्ते झाला. यावेळी आमदार सर्वश्री प्रवीण पोटे, केवलराम काळे, प्रवीण तायडे, अचलपूरच्या नगराध्यक्ष रुपाली माथने, निमकुंडच्या सरपंच रत्ना नागले, उपसरपंच अनिल अकोले, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, सहाय्यक जिल्हाधिकारी तथा धारणी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ शुक्ला, पोलीस अधीक्षक निकेतन कदम आदी यावेळी उपस्थित होते. पालकमंत्री बावनकुळे म्हणाले, क्रांतिसूर्य बिरसामुंडा यांनी त्याग, संघर्ष आणि स्वातंत्र्य लढ्यातील अतुलनीय योगदानातून आदिवासी समाजा समोर मोठा आदर्श निर्माण केला आहे. या समाजाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने विविध कल्याणकारी योजना आखल्या आहेत.या योजनांचा लाभ प्रत्येक आदिवासी कुटुंबापर्यंत पोचविण्यासाठी राज्यशासन प्रयत्न करीत आहे. ११ ते १८ नोव्हेंबर दरम्यान जनजातीय गौरव दिवस सेवा सप्ताह साजरा होत असून या सप्ताहात निमकुंडसह मेळघाटातील सर्व आदिवासी गावांमध्ये शासनाच्या सर्व योजना पोचविण्यात येतील असे त्यांनी सांगितले. या गावात पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी आराखडा तयार करण्यात येईल. सध्या गावात सुरू असलेली पाणी पुरवठा योजना अपुरी असल्याने नव्याने तयार करण्यात आलेल्या ३ कोटी ४४ लाख खर्चाच्या योजनेस मंजुरी देण्यात येणार, तसेच या गावासाठी अन्य विकास कामांसाठी ५० लाखांच्या निधीतून कामे राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

तत्पूर्वी, गावचे उपसरपंच अनिल अकोले यांनी स्वागतपर भाषण केले. आमदार केवलराव काळे यांनी प्रास्ताविक केले तर आमदार प्रवीण पोटे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

मोबाईलसाठी पैसे न दिल्याचा राग अन...: वडील झोपल्याचं पाहून लोखंडी फुकारीनं डोक्यात वार, १९ वर्षीय मुलानं बापाला संपवलं, धारशिवमधील घटना

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

धाराशिव – मोबाईल घेण्यासाठी पैसे न दिल्याच्या रागातून मुलानेच जन्मदात्या वडिलांच्या डोक्यात लोखंडी फुकारीने वार करून खून केल्याची धक्कादायक घटना तुळजापूर तालुक्यातील येवती येथे घडली. या प्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी मुलाला पोलिसांनी अटक केली आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, येवती येथे १० नोव्हेंबर रोजी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास श्रीशैल उर्फ बबलू खंडू डोंबाळे (वय २९, रा. येवती) याने मोबाईल घेण्यासाठी वडिलांनी पैसे न दिल्याचा राग मनात धरून वडील खंडू पांडुरंग डोंबाळे (वय ५६) यांच्या डोक्यात लोखंडी फुकारीने जोरदार वार केले. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या खंडू डोंबाळे यांचा मृत्यू झाला.याप्रकरणी सुरेखा खंडू डोंबाळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून श्रीशैल उर्फ बबलू खंडू डोंबाळे याच्याविरोधात नळदुर्ग पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुंबई पोलीस दलातील जवानानं जीवन संपवलं, पोलिसानं टोकाचं पाऊल का उचललं? कारण समोर

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – मुंबई पोलीस दलातील पोलीस शिपाई विजय बागुल यांनी जीवन संपवलं आहे. विजय बागुल हे दिंडोशी पोलीस ठाण्यात कार्यरत होते. पायाला झालेली दुखापत बरी होत नसल्यानं विजय बागुल त्रस्त होते, अशी माहिती आहे. बागुल यांनी कुर्ला येथील नेहरुनगरमधील पोलीस वसाहतीत जीवन संपवलं. विजय बागुल यांच्या पश्चात पत्नी, १० वर्षांचा मुलगा आणि ६ वर्षांची मुलगी असा परिवार आहे.

मुंबई पोलीस दलातील पोलीस शिपाई विजय बागुल यांनी आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. दिंडोशी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या बागुल यांनी राहत्या घरी जीवन संपवले. विजय बागुल पायाला झालेल्या अंतर्गत दुखापतीमुळे अनेक दिवसांपासून त्रस्त होते. विजय बागुल हे उपचार करूनही वेदना कमी होत नसल्याने मानसिक नैराश्यात गेल्याची माहिती आहे.

अस्तंबा ऋषींच्या यात्रेत काळाचा घाला! ५ दिवसांच्या शोधानंतर ५० वर्षीय भाविकाचा मृतदेह दरीत आढळला

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

नंदुरबार – सातपुड्यातील सर्वोच्च शिखर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अस्तंबा ऋषींच्या यात्रेदरम्यान एक दुर्दैवी घटना घडली आहे. दर्शनासाठी डोंगरावर गेलेले ५० वर्षीय भाविक खोल दरीत कोसळल्याने त्यांचा मृत्यू झाला. तब्बल पाच दिवसांच्या शोधमोहिमेनंतर त्यांचा मृतदेह दरीत आढळून आला. जेरमा वळवी असे मृत भाविकाचे नाव



असून ते अक्राणी तालुक्यातील मुंदलवड गावचे रहिवासी होते. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

अस्तंबा यात्रेला भाविकांची मोठी गर्दी धडगाव तालुक्यातील अस्तंबा ऋषींची यात्रा यंदाही मोठ्या उत्साहात पार पडत आहे. दिवाळीतील धनत्रयोदशीपासून या यात्रेला सुरुवात झाली. नंदुरबार जिल्ह्यासह खान्देश, गुजरात आणि मध्य प्रदेशातून हजारो भाविक दर्शनासाठी येथे दाखल होतात. विशेषतः आदिवासी बांधवांची या यात्रेत मोठी उपस्थिती असते. यंदा भाविकांची संख्या नेहमीपेक्षा अधिक असल्याचे दिसून आले. अस्तंबा ऋषींच्या दर्शनासाठी मुख्य गाभाऱ्यापर्यंत लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

मुलाला डोंगराच्या पायथ्याशी थांबवून गेले दर्शनाला मिळालेल्या माहितीनुसार, जेरमा वळवी हे ७ नोव्हेंबर रोजी अस्तंबा ऋषींच्या दर्शनासाठी गेले होते. यावेळी त्यांनी आपल्या मुलाला डोंगराच्या पायथ्याशी थांबवले आणि स्वतः दर्शनासाठी शिखराच्या दिशेने प्रस्थान केले. मात्र, बराच वेळ उलटूनही ते परत न आल्याने मुलगा आणि कुटुंबीयांची चिंता वाढली. वडील बेपत्ता झाल्याचे लक्षात आल्यानंतर कुटुंबीयांनी त्यांचा शोध घेण्यास सुरुवात केली. अखेर दोन दिवसांनंतर त्यांची पत्नी कागडीबाई वळवी यांनी धडगाव पोलीस ठाण्यात पती बेपत्ता असल्याची तक्रार नोंदवली.

अमरावतीच्या वडरपुरा येथील वस्तीत

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कष्टकरी महिलांसमवेत साजरी केली दिवाळी भाऊबीज

वनजमिनीचे पट्टे महसूल विभागामार्फत कष्टकऱ्यांना मोफत देण्याचा केला निर्धार!

(प्रतिनिधी वरुड दर्पण)









अमरावती – राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी वडरपुरा येथील कष्टकरी महिलांसमवेत दिवाळी भाऊबीज साजरी केली. यावेळी कष्टकरी महिलांकडून त्यांचे औक्षण करण्यात आले. ४० वर्षापासून वन विभागाकडे नोंदलेल्या जमिनी महसूल विभाग ताब्यात घेऊन संजय नगरातील गोरगरीब जनतेला घर बांधकामासाठी उपलब्ध करून देण्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला. यासाठी येत्या २७ तारखेला विशेष बैठक घेण्यात येईल अशी घोषणाही पालकमंत्री बावनकुळे यांनी यावेळी केली.

दिवाळीचा सण यावर्षीच्या दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर गोरगरीब जनतेमध्ये जाऊन साजरा करण्याच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार पालकमंत्री नागपूर जिल्ह्याच्या दौऱ्यानंतर आज अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. यादरम्यान त्यांनी अचलपूर तालुक्यातील आदिवासी बांधवांसोबत दिवाळी साजरी करून सायंकाळी अमरावती शहरातील वडरपुरा येथील कार्यक्रमास उपस्थित झाले. यावेळी हजारोच्या संख्येने या परिसरातील कष्टकरी महिला उपस्थित होत्या.

सर्व उपस्थित महिलांना दिवाळीनिमित्त शुभेच्छा व्यक्त करून पालकमंत्री बावनकुळे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्याचा सर्वांगिन विकासाचा संकल्प केला असून अमरावती जिल्ह्याच्या विकासासाठी अनेक प्रश्न मार्गी लावले जात आहेत. शेतकरी आणि शेतमजूर हा विकासाचा केंद्रबिंदू मानून गोरगरीब कष्टकरी वर्गाला आधार देण्यात येणार आहे. वडार समाजाच्या मुलांना ७०० ब्रासपर्यंत दगड-गोटा रॉयल्टी शिवाय मोफत देण्यात येणार आहे.

अशी सवलत कुंभार समाजाला यापूर्वी देण्यात आली असून ई-श्रम कार्ड, प्रधानमंत्री आवास योजनांचा लाभ या कष्टकऱ्यांना देण्यात येणार आहे. वन विभागाच्या जमिनीच्या बदल्यात महसूल विभाग जमिनी देऊन अशा जमिनी समाज घटकाला दिल्यानंतर प्रॉपर्टी कार्ड देण्यात येणार आहे. अडीच लाख रुपयांचे अनुदान घर बांधण्यासाठी देण्याचा निर्णय घेण्यात येईल व त्यांना पुढील २० वर्षे वीज बिल शून्य येईल अशा सूर्यघर योजनेचा लाभ देण्यात येईल. या माध्यमातून वडार समाजाच्या उन्नतीचे ध्येय साध्य करण्यात येईल असेही ते म्हणाले.

१ जानेवारी, २०११ पूर्वी ज्या ज्या जमिनीवर घर बांधून राहत असेल अशांना प्रॉपर्टी कार्ड देण्याची योजना असल्याचे सांगून पालकमंत्री बावनकुळे यांनी रहिवाशांना १ हजार रुपयांमध्ये रजिस्ट्री करून देण्यात येईल. यासाठी विशेष शिबिराचे आयोजन करून रजिस्ट्री करून देण्याची सूचनाही त्यांनी यावेळी केली.

प्रारंभी आमदार रवी राणा आणि माजी खासदार नवनीत राणा यांनी पालकमंत्र्यांचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी अचलपूरचे आमदार प्रवीण तायडे व इतर मान्यवरांची उपस्थिती होती.

प्रास्ताविकपर भाषणात आमदार रवी राणा यांनी गोरगरीब कष्टकरी महिलांसमवेत दिवाळी भाऊबीज साजरी करण्याचा मनोदय व्यक्त करून उपस्थित राहिल्याबद्दल पालकमंत्री बावनकुळे यांचे आभार मानले व या भागातील अडीअडचणी सांगितल्या.


यावेळी पालकमंत्री बावनकुळे यांच्या हस्ते २०२७ सालच्या दिनदर्शिकेचे विमोचन करण्यात आले. पालकमंत्री यांच्या समवेत सर्व मान्यवरांनी यावेळी फुलझडी पेटवून प्रतिकात्मक दिवाळी साजरी केली. भाऊबीज भेट म्हणून यावेळी महिलांना माहेरची साडी आणि किराणा वाटप करण्यात आले.



संसदेचे विशेष अधिवेशन लवकरच?

महिला आरक्षण, परिसीमन विधेयकासाठी हालचाली

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



नवी दिल्ली – लोकसभेत आवश्यक बहुमत न मिळाल्याने घटनादुरुस्ती विधेयक फेटाळले गेल्यानंतर, आता 'परिसीमन विधेयक' मंजूर करून घेण्यासाठी केंद्र सरकारने लवकरच संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्यासाठी हालचाली सुरू केल्या असल्याचे वृत्त समोर आले आहे.

दरम्यान, या अधिवेशनात महिला आरक्षणाशी संबंधित घटनादुरुस्ती विधेयक मंजूर करून घेण्याचा सरकारचा प्रयत्न असून, हे विधेयक १५ ते १८ मतांच्या फरकाने मंजूर होईल, असा विश्वास सरकारी सूत्रांनी व्यक्त केला आहे. १३ ऑगस्ट २०२६ रोजी संसदेचे पावसाळी अधिवेशन अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आले होते, मात्र अद्याप ते संस्थगित झालेले नाही.

लोकसभेत बसला होता फटका केंद्रीय कायदा आणि न्याय राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी १६ एप्रिल २०२६ रोजी लोकसभेत घटना (१३१ वी दुरुस्ती) विधेयक, परिसीमन विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश कायदे (दुरुस्ती) विधेयक मांडले होते.

सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -१३९८०० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने - १२८१५०रु.(१०ग्रॅम)

चांदी - २००००० रु. (प्र.किलो)

कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव (क्विंटलमध्ये)

ज्वारी -	२६०० -	२८५०
गहू -	२६५० -	३०००
तूर -	१०००० -	१०७११
मूग -	७५०० -	८६५०
उडीद -	७८०० -	८५००
हरभरा -	६८०० -	७३००
सोयाबिन -	६८०० -	७१६१
बाजरा -	२००० -	२३००
तिळ -	१२००० -	१३०००
भुईमूग -	७२५० -	७४५०
मका -	२८०० -	२९००

अल्पवयीन युवतीला पळवुन नेल्याप्रकरणी

30 वर्षीय युवकाविरुध्द गुन्हा दाखल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



वरुड – अल्पवयीन युवतीला पळवुन नेल्याप्रकरणी खडकपेंड येथील ३० वर्षीय युवकाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

शहरातील मिरची प्लॉट परिसरातील ४१ वर्षीय महिला तिचे १७ व १५ वर्षीय मुलींना घेवुन संत्रा मंडी वरुड येथून कामावरुन केदार चौक मार्गे घरी पायी जात असतांना मटन मार्केट जवळ फिर्यादीचे लहान मुलीला वय १७ वर्ष २ महिने ही दिसुन आली नाही म्हणुन फिर्यादीची लहान मुलगी केदार चौकाकडे आली व बघितले असता पिडीता ही खडकपेड येथे राहणारा सोनु उईके याचे मोटरसायकलवर बसून पांढुर्णा चौकाकडे जातांना दिसली असता फिर्यादीचे लहान मुलीने मैत्रिणीचे मोबाईल वरुन सोनु उईके याचे मोबाईलवर फोन लावला असता पिडितेने फोन उचलला व मी मुलताई चौक येथे आहे, असे म्हणुन फिर्यादीची मुलगी व मैत्रिण यांनी मुलताई चौकात जावुन बघितले असता ती तेथे सुध्दा दिसली नाही. तिचा सर्वत्र शोध घेतला असता ती कुठेही आढळुन आली नाही. त्यामुळे फिर्यादीच्या तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी सोंनु उईके (३०) रा.खडकपेड याचे विरुध्द कलम १३७ (२) भा.न्या.सं.२०२३ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

मुंबई कोस्टल रोडवर ५ ते ६ वाहनांची धडक; महिंद्रा एसयूव्हीला आग, काही जण किरकोळ जखमी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



मुंबई – मुंबईतील कोस्टल रोडवर गुरुवारी रात्री उशिरा ५ ते ६ वाहनांचा अपघात झाला. या अपघातात एका महिंद्रा एसयूव्हीला आग लागल्याने परिसरात घबराट पसरली.

सुदैवाने, या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, काही जण किरकोळ जखमी झाल्याची माहिती आहे. नरिमन पॉइंट ते वरळी मार्गावर अपघात प्राथमिक माहितीनुसार, नरिमन पॉइंट ते वरळी या मार्गावर पहाटे सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. सुरुवातीला दोन वाहनांची टक्कर झाली. त्यानंतर काही वाहने घटनास्थळी थांबली होती.

याचवेळी भरधाव वेगाने येणारी महिंद्रा एसयूव्ही अनियंत्रित झाल्याचा आरोप आहे.

वरुड : तालुक्यातील खडका येथील श्री श्री १००८ श्री केशवानंद दादाजी धुनिवाले दरबार येथे मोर्शी मतदारसंघाचे आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर यांच्या पुढाकाराने घेण्यात आलेल्या आशीर्वचन सोहळ्याला हजारो भाविक भक्तांनी हजेरी लावली होती. प्रसंगी भाजपा जिल्हाध्यक्ष तथा आमदार प्रताप अडसड यांचे उपस्थितीत अनेकांचा सत्कार सुद्धा करण्यात आला.



